# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

परिवहन महामंडळाच्या निगडी आगारातील कर्मचाऱ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बाबत



कर्मचाऱ्याचे नाव:- श्री. निलेश बाळासाहेब महाले
हुद्दा:- कायम वाहक क्र.५९७९

केलेली उल्लेखनीय कामगिरी:-

दि २९/८/२०२३ रोजी मार्ग क्र. ३५/१० या मार्गावर काम करत असताना बसमध्ये गर्दीचा फायदा घेत चोरट्याने प्रवाशी मुलीचा मोबाईल चोरला. ही बाब वाहक श्री. महाले यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ चालकाला बसचे दरवाजे बंद करण्यास सांगून चोराला पकडून त्याच्याकडील मोबाईल परत मिळवून सदरचा मोबाईल मुकाई चौक स्थानकावर स्टार्टर राम बनसोडे व इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रवाशी हिताश्री पाटील यांची ओळख पटवून त्यांना परत केला. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला चोरीला गेलेला मोबाईल परत मिळाल्याने वाहकाने मुलीला दिलेली ही भेट अनोखी ठरली. मोबाईल परत मिळाल्याने हिताश्री हिने वाहक व चालक तसेच पीएमपीएमएल चे आभार मानले.

दिनांक ३१/०८/२०२३ रोजी ॲड. महेंद्र हाडवळे यांनी निगडी आगार व्यवस्थापक यांना कार्यतत्पर वाहक श्री. निलेश महाले यांच्या कामगिरी बाबत प्रशंसा व कौतुक करणारा मेल पाठवलेला आहे.

---

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या निगडी आगारातील वाहक श्री. निलेश बाळासाहेब महाले यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन...!!